प्रकरण तिसरे

# 'विधवाकुमारी' मधील स्त्री दर्शन

## प्रकरण तिसरे

# 'विधवाकुमारी' मधील स्त्री दर्शन

वरेरकर पूर्व व वरेरकर कालीन काळामध्ये अनेक लेखकांनी कादंबरी लेखन केले. त्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक कादंबऱ्यांचा आढावा मागील प्रकरणामध्ये केलेला आहे. सामाजिक कादंबऱ्यात चर्चिलेले विभिन्न विषय, कादंबरीकारांनी आपल्या कथानकासाठी योजलेली पार्श्वभूमी व कादंबरीच्या क्षेत्राविषयी लेखकांच्या भिन्न अपेक्षा व कल्पना या सर्वांचा विचार करता यातील काही कादंबऱ्या कल्पनारम्य काही वास्तववादी व काही कादंबऱ्या प्रचारकी दिसून येतात.

मामा वरेरकर यांच्या कादंबऱ्यांचा विचार करता त्यांच्या कादंबऱ्या हया प्रामुख्याने वास्तव स्वरूपाच्या आहेत. तर काही वेळा कादंबऱ्या प्रचारकी देखील वाटतात.[1] मामा वरेरकर यांनी १९२८ साली लिहिलेल्या 'विधवाकुमारी' या कादंबरीचा अभ्यास या प्रकरणात आपण करणार आहोत. एका मुलीला लहान वयात वैधव्य आले असतानाही निर्धाराच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावर ती कशा प्रकारे यश मिळवते हे मामा वरेरकर यांनी या कादंबरीत दाखविले आहे.

ज्याकाळी मामा वरेरकर यांनी 'विधवाकुमारी' कादंबरी लिहिली त्यावेळचा समाज हा आजच्या इतका सुधारला नव्हता. तरीही 'विधवाकुमारी' कादंबरी मधील नायिका मथू ही विधवा असूनही कुंकू लावू लागते. मथूच्या हया वर्तनाचा हळूहळू परिणाम होऊन महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व प्रातांतील विधवा स्त्रिया आज कुंकू लावू लागल्या आहेत. ''कोण म्हणतो साहित्याचा परिणाम होत नाही म्हणून ?''[2] हे मामा वरेरकरांचे विधान या कादंबरीच्या संदर्भात योग्य वाटते.

स्त्री हा साहित्याचा तसा सनातन व प्रमुख विषय संस्कृत साहित्यातून प्राचीन शिल्पातून, प्राकृत गद्यातून, किंवा

मराठीतील लावणी सारख्या वाङ्मयातून स्त्रीचे चित्रण ठळकपणे केल्याचे दिसून येते. 'विधवाकुमारी' कादंबरीत वरेरकर यांनी महाराष्ट्रातील बालविधवांची करूण स्थिती हा त्या काळातील ज्वलंत विषय हाताळलेला आहे. वरेरकर यांनी आपल्या कादंबरीतून विधवांच्या दयनीय अवस्थेचे वर्णन केलेले आहे. दु:खाने गांजलेली व अन्यायाने पिचलेली भग्नहृदय बालविधवा आत्मप्रगतीचा फार मोठा टप्पा गाठू शकते. हे वरेरकर यांनी प्रमुख प्रतिपादन केलेले आहे. स्त्री केवळ आपल्यावर झालेल्या परिस्थितीला शरण जाते. आणि आप्तेष्टांची व शेजाऱ्यापाजाऱ्यांची मरमर कामे करून कुचेष्टेची बोलणी ऐकत आला दिवस कशीबशी जगत असते. वास्तवात दिसत असणाऱ्या कठोर सत्याला वरेरकरांनी आपल्या 'विधवाकुमारी' या कादंबरीतून हद्दपार केले आहे. स्त्रियांच्या दुदैवाची करूण कहाणी घराघरातून घडत असताना वरेरकर यांनी यातून एक वेगळाच मार्ग काढलेला आहे.

मामा वरेरकर दापोली येथे राहत असताना त्यांच्या शेजारी ताई दातार या नावाच्या विधवाबाई आपल्या दोन मुलांसह राहत होत्या. या बाई लोकमान्य टिळकांच्या नात्यातल्या होत्या. या बाई स्वभावाने स्वाभिमानी होत्या. गरीबी आली तरी कुणापुढे ही हात न पसरता अतिशय कष्टात जीवन जगत होत्या. त्यांच्या दोन मुलांपैकी एका तेरा चौदा वर्षाची त्यांची मुलगी विधवा होती. या मुलीला 'लग्न' किंवा 'विधवा' या दोन्ही शब्दाचे अर्थ नीटसे समजत नव्हते. त्यामुळे ती विधवा असून ही अंगावर सर्व दागिने घालून हिंडत असे, आणि मी कुंकू का लावू नये ? म्हणून आपल्या आई बरोबर रोज भांडत असे. या न कळत्या वयात आलेले मुलीचे वैधव्य पाहून त्या बाईच्या डोळयातून आसवांचा पूर वाहत असे. ही

एक घटना व मुली एवढी आई व आई एवढी मुलगी असल्याची दुसरी घटना मामा वरेरकरांच्या डोळयासमोर होत्या.

वरील दोन घटना मिळून वरेरकरांनी 'विधवाकुमारी' ही कादंबरी लिहिली.

'विधवाकुमारी' कादंबरीची नायिका मथू हिने कादंबरीच्या सुरूवातीलाच आपले आत्मचरित्र सांगितलेले आहे. मथू ही एका गरीब कुटुंबातील आईवडिलांची एकुलती एक मुलगी होती. मथूच्या वडिलांना मुलीचे लग्न लवकर व्हावे असे वाटत असे, तर मथूच्या आईला मुलीचे लग्न लवकर होऊ नये असे वाटे. कारण मथूची आई आपले बालपणात लग्न झाल्यामुळे ज्या यातना, दु:ख आपल्याला सोसावे लागले ते आपल्या मुलीला सोसावे लागू नये असे मथूच्या आईला वाटे. पंरतु मथूला मंगळ असल्यामुळे मथूचे लग्न एका बिजवराशी ठरते. मथूच्या वडिलांच्या मते तरूणाला देऊन वैधव्य येण्यापेक्षा म्हाताऱ्याला देऊन सौभाग्य मिळालेले बरे. मथूचे लग्न एका वयस्क माणसाशी ठरले हे ऐकताच मथूची आता पुढे धडगत नाही असे मथूच्या आई वाटत होते. म्हणूनच मथूची आई मथूला बालपणापासूनच विचार करण्याची प्रेरणा देते.

मथूचे लग्न एका वृध्द माणसाशी ठरले आहे. हे कळताच मथूची बालमैत्रीण बनी, बनीची आई व शेजारच्या बायका मथूची चेष्टा करतात. वयाच्या अकराव्या वर्षी मथूचे लग्न होते. काही दिवसानी मथू सासरी जाते. सासरी जाताच समोर येते ती तिच्या आईच्या वयाची तिची सावत्र मुलगी ताई, पुतणी लीला, मोठी जाऊ व एक वडील नणंद यांचा परिचय मथूला होतो. मनात असो वा नसो मथूला सासरच्या लोकांच्या मर्जीप्रमाणे रहावे लागते.

मथू आज ना उद्या विधवा होणार हे सर्वांना माहित होते. म्हणूनच मथू सर्वांच्या चर्चेचा विषय बनते. म्हणूनच मथूची

सावत्र मुलगी ताई ही मथूला आयुष्याचा विचार करण्यासाठी प्रवृत्त करते. वेळोवेळी तिला मदत व मार्गदर्शन करते.

मथू विधवा होते. तेव्हा आता पुढे मथूचे कसे होणार हा एकच प्रश्न मथूच्या आईवडिलांना पडतो. म्हणूनच ताई व ताईचे यजमान मथूला पुढे शिकवण्याचा सल्ला मथूच्या वडिलांना देतात. आपण विधवा झालो म्हणजे नेमके काय झाले हेच मथूला समजत नाही. हातापायाने, नाका—डोळयांनी आहे तशीच आहोत. मग मी विधवा कशी झाले असा प्रश्न मथूला पडतो. नकळत्या वयात मुलीला आलेले वैधव्य पाहून मथूचे आई—वडील खचून जातात. यातच मथूच्या आईचा मृत्यू होतो.

मथू विधवा असूनही कुंकू लावू लागते. त्यामुळे सर्वत्र चर्चा सुरू होते. जे कुंकू आपण जन्मापासून लावतो त्यांच्यावर इतर कोणाचाही अधिकार नाही असे असताना आपण ते कपाळावर का लावू नये असा प्रश्न मथू समाजाला विचारते. ताईचा धाकटा दीर चंदू मथूचा रोज अभ्यास घेत असे; मथूच्या जीवनात चंदूला महत्त्वाचे स्थान आहे.

मथू, गावोगावी जाऊन प्रवचन देऊ लागते, मथू कुंकू लावते याचे सर्व बायका समर्थन करतात. एके दिवशी मथू आपल्या माहेरी प्रवचन देते. हे पाहून मथूच्या वडिलांना आपल्या मुलीने बेचाळीस पिढयांचा उध्दार केला असे वाटते. मथू प्रवचन देते हे पाहून मथूच्या बालमैत्रिणीला आपण शिकलो नाही याची खंत वाटते. बनी मथूला कुंकू लावते हे पाहून मथूच्या सावत्र आईला ही आजकालच्या मुलींची थेरं आहेत असे वाटते.

ताईचा धाकटा दीर चंदू याचे मथूवर प्रेम असते. चंदू मथूला लग्नाविषयी विचारतो पण मथू नाही म्हणून सांगते. हे ऐकून चंदूला फार वाईट वाटते. ताई व भाऊसाहेबांच्या इच्छेप्रमाणे चंदूचे

लग्न एका श्रीमंत घराण्यातील सरस्वती नावाच्या मुलीशी होते. पण चंदूचा संसार सुखाचा होत नाही.

मथू पुण्याला जाते. मथूचे धाकटे दीर नानासाहेब मथूचे दागिने व विम्याचे पैसे आपणाला मिळावेत म्हणून मथूला मारायलाही मागेपुढे पाहात नाहीत. मथू नानासाहेबांना उलटून बोलते म्हणून नानासाहेब मथूला घरातून बाहेर काढतात. त्यावेळी मथूची पुतणी लीला मथूची पुस्तके मथूला देते. मथू जाण्यासाठी निघते पण कोठे जावे हेच मथूला कळत नाही. रेल्वे स्टेशनवर चंदूची व मथूची अचानक भेट होते मथू सासरी घडलेली सर्व हकीगत चंदूला सांगते. चंदू बरोबर मथू मुंबईला जाते. एका मिशनरी बोर्डिंगमध्ये चंदू मथूचे नाव दाखल करतो. तेथे बऱ्याच जातीधर्माच्या मुली राहत होत्या. मथू मिशनरी शाळेत बायबलावर पुराण सांगते. व सर्वत्र मथूच्या पुराणाची चर्चा होते.

सुट्टीला मथू ताई व काकासाहेबांच्या घरी जाते. मथूने बायबलावर पुराण सांगितले म्हणून मथूच्या नावाचा गवगवा सुरू होतो. मथू देवळात जाऊन शपथ घेण्यास तयार होत नाही. याचा ताई, काकासाहेब व गावातील लोकांना राग येतो. आपणामुळे ताई व काकासाहेबांना गावातील लोकांपुढे खाली मान घालावी लागते. याचे मथूला वाईट वाटते. आधीच माहेर परके झालेले, सासरच्या लोकांनी हाकलून दिले आणि आता ताईचाही आधार नाही. अशा प्रसंगाच्या वेळी मथू खचून न जाता धीराने आलेल्या प्रसंगाला सामोरी जाते. ताई व काकासाहेबांचा निरोप घेऊन त्यांचे घर सोडते. पुन्हा मुंबईला मिशनरी शाळेत दाखल होते. मथूच्या परीक्षेचा रिझल्ट लागतो. व मथूला जगन्नाथ शंकरशेट संस्कृतची स्कॉलरशिप मिळते.

मथूची हुशारी पाहून स्मिथबाई मथूला विलायतेला जावे असे सुचवतात. ताई व काकासाहेबांच्या पाठिंब्यामुळे मथू प्रो. शंकर आबाजी भिसे यांच्या परिवाराबरोबर विलायतेला जाण्यासाठी

निघते. आपण पुन्हा केव्हा हिंदुस्थानात येणार, ही मातृभूमी पुन्हा दिसेल का ? आता केव्हा परत भेट ? असे अनेक प्रश्न मथूच्या मनात येतात.

मामा वरेरकर यांना आपल्या कादंबऱ्यातून 'नवी—स्त्री' घडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कादंबरीत दिसून येणारी स्त्री ही केवळ दैवावर अवलंबून नसून प्रयत्नांची कास धरणारी आहे. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेल ही गळे' या म्हणीनुसार प्रयत्नपूर्वक आपली परिस्थिती बदलण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसते. भावनेपेक्षा बुध्दीचे महत्त्व ती ओळखते. जगातील दुर्धर संघर्षाची जाणीव ती बाळगून आहे. शिथील परंपरेच्या चौकटीत राहून नव्या विचार प्रवाहांना सामावून घेण्याचा तिचा प्रयत्न आहे. आलेल्या प्राप्त परिस्थितीची बंधने तोडून ती पुढे येताना दिसते. रूढी विरूध्द वर्तन करून ती आपल्या वर्तनाचे समर्थन ही करते. वरेरकरांच्या सर्व नायिकांपेक्षा 'विधवाकुमारी' या कादंबरीतील नायिका 'मथू' हिचे व्यक्तित्त्व अनेक दृष्टीनी संपन्न व विकसित आहे. कारण दु:खाचा डोंगर कोसळला असतानाही तिच्या ध्येयपूजेत खंड पडला नाही. तावून सुलाखून बाहेर पडल्यामुळे तिच्या जीवनाला सुवर्णाचे मोल चढले आहे.

मामा वरेरकर यांनी कादंबरीच्या पहिल्याच पानावर आगरकर यांचे एक मार्मिक वाक्य उद्‌धृत केलेले आहे. ते या कादंबरीचे ध्येयवाक्य आहे असे वाटते ते असे — ''ज्या मतास आपण तऱ्हेवाईक मते म्हणतो ती त्यांच्या नवीन तत्त्वामुळे बहुधा तऱ्हेवाईक वाटतात. कालांतराने ती तशी वाटेनाशी होतात ...''[२]

आगरकर यांचे वरील विधान 'विधवाकुमारी' कादंबरीच्या आरंभी देण्यात मामा वरेरकर यांनी योजकता व औचित्य दाखविले आहे.

'विधवाकुमारी' कादंबरीची नायिका मथू ही एका महाराष्ट्रीय कुटुंबातील आहे. तिच्या जीवनात अद्‌भूत, अघटित, अवास्तव असे काहीच नाही. प्रत्येक मुलीच्या आयुष्यात घडते तेच मथूच्या आयुष्यात घडते. मथूच्या मते साऱ्याच मुली जर आपले चरित्र लिहू लागल्या तर शेकडा अशी चरित्रे एका साच्यांची निपजतील. मथूच्या आयुष्यात वेगळे असे काय होते ? मथू ही अगदीच सर्वसामान्य नव्हती. तिचा बाणेदारपणा, करारीपणा व शिक्षणाविषयीची कळकळ इत्यादी गुण तिच्या अंगी होते.

मथूला बालवयातच नीतिमूल्यांची शिकवण मिळालेली होती. सत्याविषयीची एकांतिक निष्ठा तिच्या बालमनातच वाढीला लागली होती. आयुष्यात गंडातरे आलेली असताना ती कधी नीतिभ्रष्ट किंवा शिलभ्रष्ट झालेली नव्हती. हा मथूचा असामान्य गुण होता. परंतु 'खरे काय आणि खोटे काय ?' हा प्रश्न मथूला भेडसावत होता. खरे बोलल्यामुळे मथूला अनेक प्रसंगाना सामोरे जावे लागले. मथू चार—पाच वर्षांची असताना तिच्या वडिलांनी तिला हरिदासबुवाच्या पाया पडण्यासाठी घेऊन गेले. परंतु तेथे फार गर्दी असल्यामुळे बाबांनी तिला बाजूला ठेवले. लोकांची झुंबड उडाली व या गर्दीतच मथूला लोकांचे धक्के लागण्याचा राग असल्यामुळे ती बुवांना कडकडून चावते. या गोष्टीचा मथूच्या बाबांना फार राग येतो. घरी येताच मथूचे बाबा सगळा राग मथूच्या आईवर काढतात. आणि दुसरा प्रसंग म्हणजे शाळेत असताना तिची बालमैत्रीण बनीने गोदूच्या पुस्तकांच्या पिशवीत एक लहानशी बेटकुळी ठेवलेली मथूने पाहिले होते. मथू जेव्हा मास्तरांना ही गोष्ट सांगते. तेव्हा वर्गातील कोणीच तिच्याशी बोलत नाही. परंतु ती नेहमी खऱ्याचीच साथ देते. एके दिवशी मथूच्या वडिलांकडे कोणी देणेकरी येतो. तेव्हा वडिलांनी आपण घरात नाही म्हणून सांगितले असतानाही वडिल घरातच आहेत असे खरे सांगते. खरं आणि खोटं

यात असणारी अदृश्य सीमारेषा समजायलाही एक ठराविक वय होण्याची आवश्यकता असते. पण मथू ही इतकी लहान आहे, मनाने निर्मळ आहे की तिला, खरे का बोलायचे आणि खोटं का बोलायचे हेच समजत नाही. म्हणून ती आईला विचारते, खरं म्हणजे काय आणि खोटं म्हणजे काय ? आणि आई उत्तर देते की, ''जे माणसाला सुचतं, पण देवाला रूचत नाही ते खोटं''[३]

मथूच्या लग्नाविषयी घरात चर्चा सुरू होते. तेव्हा मथूला लग्न म्हणजे काय हे नीट्से कळत नाही. हल्ली प्रमाणे तेव्हाच्या काळी मुलामुलीच्या लग्नाच्या कामी बायकांचा सल्ला घेतला जात नसे. मथूची आई ही स्वत:चे बालविवाहानंतरचे कष्टाचे दिवस आठवून मुलीचे लग्न थांबवण्याचा काहीही उपाय करू शकली नाही. मथूचे लग्न ठरल्यानंतर मथूच्या आईच्या अंत:करणाची कालवाकालव झाली. तिचे मातृहृदय कळवळले, ''लोकांच्या डोळयांना तू मोठी दिसत असशील पण माझ्या डोळयांना तू अजून रांगत मूल दिसत आहेस''[४] मथूच्या आईचे मथूवर विलक्षण प्रेम होते. तिचे लग्न करून तिला सासरी पाठवायची कल्पनाच मथूच्या आईला दु:सह होत असे.

मथूला मंगळ असल्यामुळे प्रथम वराच्या एकाही स्थळाची पत्रिका जुळत नाही. याच कारणामुळे भिकंभटजीच्या सांगण्यावरून मथूचे वडिल मथूचे लग्न पत्रिकेतील छत्तीस गुण पाहून एका वृध्द बिजवराशी ठरवितात. पण या विवाहामुळे मथूच्या आईला तिच्या भवितव्याची फार काळजी वाटते. मथूचा नवरा हा वयस्क आणि बिजवर आहे हे कळल्यावर मधूची आई चिंता व्यक्त करू शकली पण प्रयत्न करू शकली नाही. म्हणूनच मधूची आई म्हणते '' मधू मला तुझी धडगत दिसत नाही. अंतरातून देव बोलतो आहे की मधूच्या कपाळी पुढं सुख नाही, जसं व्हायचं तसं होईल आतांच

म्हणायच झालं ना? देवावर भरिमार ठेवून तुझ्या डोक्यावर अक्षता टाकायच्या एवढचं''[५]

मथू ही निरागस, निर्व्याज आहे. म्हणून 'बिजवर म्हणजे म्हातारा का गं ?' असा प्रश्न ती आईला विचारते हा मथूचा जितका साधा सरळ तितकाच मर्मभेदक प्रश्न ऐकूण मथूच्या आईच्या काळजाचे पाणी होते. मथूची आई सुशिक्षित नव्हती. तिला लिहिता वाचता येत नव्हते. पण आपल्या मुलीला बालपणापासूनच विचार करण्याची प्रेरणा देते. मथूच्या मनात सत्याविषयीची एकांतिक निष्ठा निर्माण करते.

बनी ही मथूची बालपणापासूनची मैत्रीण, तिचे लग्न एका बावळट मुलाशी ठरले होते. तरी ती खूष आहे. परंतू मथूचे लग्न एका बिजवराशी ते ही एका वयोवृध्द गृहस्थाशी ठरले आहे. हे पाहून बनी, बनीची आई, शेजारी पाजारील बायका मथूची टवाळी करतात. मथूला 'आजीबाई' या नावाने संबोधतात. मथू आपल्या लग्नाविषयी अगदीच निष्पाप व अजाण होती. कुणाचे उणेदुणेही तिला कळत नाही. मथू बनीच्या घरी जाते. बनीचं लग्न बावळया गोंदूशी ठरले आहे. हे मथूला कळते. बनीच्या बावळया वराविषयी मथूच्या तोंडून काही शब्द बाहेर पडतात न पडतात तोच बनीचें बोलणे मथूला ऐकावे लागते. बनीच्या बोलण्यात खोच आहे. तीव्र उपरोध आहे. बनी म्हणते — 'माझं आपल बावळं ध्यान आहे ते बरं तो म्हातारा तर नाही ना ?'

बनीच्या लग्नकामात मदत करावी म्हणून मथू म्हणते 'एक पोळपाट द्या माझ्याकडे मी चार पापड लाटते'. तेंव्हा बनीची आई म्हणते "आता पोळपाटच आहे तुझ्या कपाळी मीच कशाला तुझ्या हाती देऊ तो ?"[६] मथू घरी जाण्यासाठी निघते तेंव्हा कोणीतरी म्हणते 'चाललात का आजीबाई! जरा थांबा, कुंकू लावते. ' आणि असे ती म्हणाली खरी पण बसल्या जागेवरून उठली

नाही. हे सर्व पाहून माणसे किती विचित्र असतात हे मथूला कळते. मथू घरी येताच आपल्या आईला विचारते — 'कपाळी पोळपाट आहे म्हणजे काय ग आई ?' हा प्रश्न ऐकून कोणत्या आईच्या काळजाचे पाणी होणार नाही.? हे सारे कळण्यापूर्वी मथूचा विवाह होणार होता.

लग्न म्हणजे काय ? हे समजण्याचे वय नसतानाही मथूचे अकराव्या वर्षी लग्न होते. एका मुंगीला तिचे हिमालयाशी लग्न लागल्यावर जे काही वाटले असते तशीच काहीशी कल्पना मथूच्या मनात निर्माण झाली असेल. मथूचे लग्न एका वृध्द बिजवराशी झाल्यामुळे गावातील लोकांच्यात चर्चेचा विषय झालेल्या मथूला आपल्या वडिलांचा चेहरा पाहून हसावे की रडावे हेच कळत नाही. मथूचे लग्न झाले तरी घरात एक प्रकारची अमंगळ अवकळा पसरली होती. मथूचे लग्न झाले तरी आईच्या सांगण्यावरून तिला काही दिवस माहेरीच ठेवली होती. लग्न झाल्यामुळे मथूला पहिल्यासारखे बाहेर जाता येत नव्हते. थोडयाच दिवसात मथूला सासरी पोहोचती करण्याविषयी पुण्याहून पत्र येते. मथू आपल्या वडिलांसह दाभोळ, मुंबईमार्गे पुण्याला येऊन पोहोचते. पुण्यातील सदाशिव पेठेतील आपल्या सासरच्या घरी आल्यानंतर आपण कुणीतरी क्षुद्र कीटक आहोत आणि उच्च कोटीतील जीवात येवून पडलो आहोत असे मथूला वाटू लागते. 'आलं कोकणच ध्यान'[७] ही पुतणी लीलाने मथूला दिलेली पहिली सलामी घरी येताच पुतणी लीलेचे उद्‌गार निघतात "आई साहेबांना घरात कडेवरून नेणार की खांद्यावरून नेणार?"[८] हे ऐकून मथूचे अंत:करण गहिवरून येते.

मथू सासरी येते तर समोर येते जवळ जवळ तिच्या आईच्या वयाची तिशी ओलांडलेली एक स्त्री ती मथूची सावत्र मुलगी ताई. कोणी कोणाला आई म्हणावे हा त्या दोघीच्या पुढे प्रश्न उभा राहतो. पण मथूला ताई आईसारखी वाटते. तर ताईला मथू मुलीसारखी वाटते. मथू अकराव्या वर्षी आपल्या आईच्या वयाच्या

मुलीची आई झाली होती. मथूला ताई आपल्या आईसारखी वाटू लागल्यामुळे मथू नेहमी ताईशी बोलत असे. मथूची सावत्र मुलगी ताई ही मूर्तिमंत देवता आहे. ताईमुळेच सासरी आल्यानंतर मथूला परकेपणा जाणवेनासा झाला.

मथूच्या सासरी एक वडील नणंद होती. तिचा स्वभाव अतिशय खाष्ट होता. लग्न समारंभाच्या वेळी मथूने हजर न राहण्याविषयी आपला निश्चय सांगावा आणि वन्संसारख्या खाष्ट स्त्रीचे बोलणे ऐकून मथू भयभीत व्हायची. ''सासुरवास म्हणतात तो हाच का ?''[९] असा प्रश्न मथू ताईला विचारते.

एके दिवशी मथूचे वडील मथूला माहेरी नेण्यासाठी येतात तेव्हा आता या जाचातून सुटू माहेरी जाऊन आईला भेटेन, बनीची हकीकत विचारीन हे विचार मथूच्या मनात सतत चालू असत यातच मथू देव पूजेची तयारी करायची विसरते. म्हणून मथूचे धाकटे दीर नानासाहेब मथूच्या बेचाळीस पिढयांचा उद्धार करतात. दोन चार दिवसात मथू माहेरी येते व एके दिवशी बनीला भेटण्यासाठी तिच्या घरी जाते. तेंव्हा बनीची आई मथूला खोदून खोदून ताईबद्दल विचारते. पण त्यांच्या प्रश्नाचे काय उत्तर द्यायचे हे मथूला कळत नाही. त्याचवेळी बनी मथूला म्हणते ''अगदी एकटीच आलीस का? मुलीला नाही आणलंस कुठं कडेवरनं ?''[१०]

ताई समंजस व प्रेमळ आहे. मथू सारख्या एका अल्पवयीन मुली बरोबर आपल्या वडिलांनी लग्न का केले ? याचा विचार ताई ही करते. पण याविषयी समर्थन करीत असताना ताई बनीच्या आईला सांगते — 'दादांच्या मनात पुनर्विवाह करायचा होता. अगदी एवढयाशा मुलीशी लग्न करणं त्याच्या जिवावर आलं होत — पण करायचं काय, पुनर्विवाह केला नसता तर सर्वांनी वाळीत टाकल असतं — निपुत्रिकपणा घालवायचा आणि पुनर्विवाह तर करायचा नाही तेंव्हा राहिला हा एकच उपाय.'[११] आपल्या मुळेच

मथूच्या आयुष्याचे मातेरे झाले. तिचे जीवन उद्ध्वस्त झाले असे ताईला वाटत होते.

मथू ताईच्या गावी जाते. ताईचे यजमान भास्करराव आणि ताईचा धाकटा दीर भालचंद्र यांचा मथूला सहवास घडला. भास्कररावांना गावची सारे माणसे मान देत. ते सुस्वभावी होते. मथूला पाहिल्यावर भास्करराव म्हणाले "ही कसली सासू? असल्या दहा सासवा मी माझ्या खिशांत घालून नेईन ! ते काही नाही. मी हिला मथूच म्हणणार कुणाच्या बापाचं सुध्दा ऐकणार नाही. !"[१२]

'विधवाकुमारी' तील चंदू हा काकासाहेबांचा धाकटा भाऊ व ताईचा धाकटा दीर आहे. चंदूला काकासाहेबा प्रमाणेच मथूविषयी सहानुभूती व प्रेम वाटते. चंदू बुध्दिमान, प्रेमळ, समंजस, होतकरू व मेहनती मुलगा आहे हे पाहून आपल्याला पुरूषांचा जन्म का आला नाही याचे मथूला दु:ख वाटे.

मथूच्या पतीचे जेव्हा निधन होते. तेव्हा मथूची आई आणि शेजाऱ्यापाजारच्या बायका रडू लागतात. म्हणून मथू ही रडू लागते. एक वृध्द विधवा बाई मथूला परसदारी नेते. आणि आपल्या हाताने तिचे कुंकू पुसते आणि मंगळसूत्र तोडून न्हाणीघरात नेऊन थंड पाण्याने आंघोळ घालते. लाजेचा पडदा आड असताना वयाच्या अकराव्या वर्षी ज्या व्यक्तीला नीट्से पाहिले ही नाही. ज्यांचा सहवास नाही. जिने संसार सुख उपभोगले नाही. सुवासिनी म्हणजे काय? व विधवा म्हणजे काय? हेच जिला माहित नाही अशा अकराव्या वर्षी लग्न झालेल्या मुलीला विधवा झाले म्हणजे काय हे कसे समजणार? म्हणूनच मी विधवा झाले म्हणजे काय झाले? हा प्रश्न मथूला पडतो.

या भयंकर प्रसंगामुळे मथूच्या आई—वडिलांचे धैर्य खचून जाते. काकासाहेबांसारखा धीराचा माणूस देखील गहिवरतो. काकासाहेब हे अतिशय हुशार व विचारवंत होते. मुलाच्या

शिक्षणाची आबाळ झाली तरी चालेल पण मुलीच्या शिक्षणाची खबरदारी ही प्रत्येक आई—वडिलांनी घेतली पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहता आले पाहिजे, तरच त्या आयुष्यात चांगल्या प्रकारचे जीवन जगू शकतील. मथूला पुढे येता यावे. व आत्मप्रगती करता यावी ही काकासाहेबांची प्रामाणिक इच्छा होती.

घडल्याप्रसंगामुळे मथूला आईची भीती वाटे, आईला बाबांची भीती वाटे, आणि बाबांना हया दोघींचीही भीती वाटे. आलेल्या असाहय परिस्थितीमधून सुटका करून घ्यावी याचीच सर्वांना काळजी वाटली होती. म्हणूनच ताई मथूच्या वडिलांना सांगते मथूला खूप संस्कृत शिकवा पडिंता रमाबाईप्रमाणे तिला ही व्याख्याने करू द्या. असा प्रेमळ सल्ला ताई देते.

आता तुला लहान राहून चालायचे नाही. देवाने लहानपणीच तुला मोठेपणा दिला आहे. अगदी अंधारात डोळे मिटून चालण्यापेक्षा तुझ्या मनात आपल्या आयुष्याबद्दलचा थोडातरी प्रकाश पडावा म्हणून ताईने बोलताना आडपडदा ठेवला नाही. मनाच्या लाजेने किंवा जनाच्या लाजेने आम्ही वडील माणसे हीच चूक करतो. ज्याला त्याला आपल्या परिस्थितीची पुरी जाणीव करून देत नाही. आणि त्यावेळी आकाशीची कुऱ्हाड माथी येऊन पडते. त्यावेळी तो प्रसंग सहन करण्याचं धैर्य अंगी राहत नाही. हे वाचताना कवी माधव ज्युलीयन याच्या त्या प्रख्यात ओळीची आठवण होते.

''आकाशीच्या कुऱ्हाडी माथी खुशाल पाडी
आघात सोसण्याचे सामर्थ्य मात्र द्यावे ।।''[१३]

काही दिवसांनी मथू पुन्हा पुण्याला जाते. ''भद्रकपाळी मेली घरी आली नाही तो एका वर्षाच्या आतंच नवऱ्याचं वाटोळं

केलं आता आली आहे आमच्या मुळावर''[१४] असे विषारी वाईट शब्द मथूला सहन करावे लागले.

पुण्यासारख्या शहरातून मथूच्या वैधव्याची निर्दय कुचेष्टा दिवसा ढवळया होऊ लागली. मथूला एकटीला शाळेत जावे लागे तेव्हा काही टवाळ मुले, प्रौढ पुरूष लोक तिची चेष्टा करीत असत हे सर्व कशामुळे तर ती एक मुलगी होती म्हणून नव्हे तर ती एक विधवा मुलगी होती, म्हणून निरूद्योगी लोकांच्या छळवादाला ती पात्र ठरली होती. विधवेने कुंकू का लावावे याचे मथून जोरदार तार्किक समर्थन केलेले आहे. मथू म्हणते ''आमच्या वैधव्याचे अशा रीतीने अन्यायाने प्रदर्शन होत असल्यामुळे आमची जी विटंबना होते. तिची जोखीम आमच्या या खुळ्या रूढीवर पडते. धर्मशास्त्रांत तसे आहे असे म्हणतात पण धर्मशास्त्रे ज्यावेळी झाली. त्यावेळी आजची परिस्थिती होती की काय, हयाचा कुणी विचार करीत नाही. पूर्वीच्या काळी कपाळीचे कुंकू पुसून विधवा आहे हे दाखवून देण्यात मूळ उपाययोजकाचा विधवेचे रक्षण करण्याचा हेतू असेल. त्यावेळी मनोभावनेच्या जोरावर जगाचे व्यवहार चालत असतील आज व्यवहाराच्या जोरावर जगाचा व्यवहार चालत आहे. भावनेला तेथे वाव नाही. अशा वेळी सोयीच्या दृष्टीने आमच्या रूढीत नको का फरक करायला''[१५] मथूने केलेली ही मीमांसा अत्यंत सडेतोड व निर्भीड आहे.

मथूने या परंपरा प्रणीत अन्यायविरूध्द निष्ठेने लढा दिला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' या लोकमान्य टिळकांच्या ध्येय वाक्याप्रमाणे 'कुंकू लावणे हा स्त्री जातीचा जन्मसिध्द अधिकार आहे. आणि तो हिरावून घेण्याचा कुणालाही अधिकार नाही.' अशी खणखणीत व दणदणीत घोषणा मथूने निर्भयपणाने न भिता केलेला आहे. विधवेने कुंकू लावू नये हा शास्त्राचार नसून अनाचार आहे असे प्रतिपादन करीत

असताना मथूने निर्दय रूढीवर ही हल्ला चढविला आहे. मथूच्या मते ''सनातन आर्यधर्म नुसता विधवेच्या फटफटीत कपाळावर का साठवला आहे? विधवांनी कुंकू लावण्याची चाल केव्हापासून प्रचारात आली हयाची तरी तुम्ही चौकशी केली आहे का? हे कपाळीचं कुंकू म्हणजे आम्हा स्त्रियांची ढाल आहे तुम्हा पुरूषांचे पापमय वार चुकविण्याचे हे आमचे रक्षणाचे साधन आहे.''[१६]

केशवपनाच्या अमानुष चालीवर मथूने केलेले भाष्य तिखट व मर्मभेदक आहे. केशवपनाबद्दल श्रृतीत किंवा स्मृतीत आधार सापडत नसून मद्रासी लोकांचे द्रविडी आचार आम्ही जितक्या लवकर टाकून देऊ तितक्या लवकर आमचं कल्याण होईल. ही. मथूची विचारसरणी ग्राहय व सर्वमान्य झाली होती असे आजच्या सामाजिक परिस्थितीवरून निदान करता येईल.

मथू विधवा होते. तेव्हा सर्वांच्या चर्चेचा विषय होते. पण यात आपले काय चुकले हेच तिला समजत नाही. विधवेचे जिणे किती चमत्कारिक स्त्री असून ही स्त्रीपणाचा अधिकार नाही, कुठे कशावर सत्ता नाही. जबाबदारी पुरूषाची, पण जन्म मात्र नुसता स्त्रीचा कुणाच्या आधाराशिवाय गत्यंतर नाही, पण आधार मात्र कुणाचाच नसतो ! कुणी कसेही वागवले तरी तक्रार करायला जागा नाही, मन मोकळे करून बोलायचे म्हटले तर जिव्हाळयाचे कुणीच नाही? स्त्रीच्या भावनिक समृध्दीची पूर्ण कल्पना वरेरकर यांना होती. म्हणून त्यांनी 'हाच मुलाचा बाप' पासून 'भूमिकन्या सीता' पर्यंत प्रखर स्त्री—वादी भूमिका घेतली.

मामा वरेरकर यांनी आपल्या कादंबऱ्यातून ब्राह्मण विधवांच्या दैन्याची चित्रे प्रामुख्याने रेखाटली आहेत. कारण तत्कालीन सामाजिक परिस्थितीत कायद्याच्या व रूढीच्या वरवंटयाखाली ब्राहमण स्त्रिया जितक्या भरडल्या जात तितक्या इतर समाजांतील स्त्रियांना त्याची झळ तितकीशी पोहचत नव्हती.

''ब्राह्मणाच्या पोरीचं जिणं हे विधवेचं लाजिरवाणं आयुष्य असंच केरपोतेऱ्यावारी फुकट जाणार! त्याला काही उपाय नाही.''[१७] हे मथूच्या आईचे उद्गार जितके वस्तुस्थिती निदर्शक आहेत तितकेच हृदयभेदक नाहीत असे कोण म्हणेल.

मथू कोकणात ताईच्या घरी जाते. तेव्हा पुण्यातील सर्व हकीकत मथू ताई व भाऊसाहेबांना सांगते. व विचारते मंगळसूत्रावर आमची सत्ता नाही, मंगळसूत्र पतीने बांधलेले असते आणि पती निधनानंतर ते गळयात नसले तर ते कोणाच्या नजरेला येत नाही. पण कपाळी कुंकू नसेल तर पटकन प्रत्येकाच्या नजरेला येते. त्यामुळे लोकांच्या चर्चेचा विषय होऊन बसतो. मग जे कुंकू आपल्याला जन्मापासून आपल्या आईवडिलांनी दिलेले आहे हे कुंकू विधवेने का लावू नये ? शाळा कॉलेजात जाणार मग माहेरचं कुंकू कपाळावर का मिरवू नये असा प्रश्न करते. त्याच दिवसापासून मथू कुंकू लावायला सुरूवात करते. सुरूवातीला गावात बरीच उलट सुलट चर्चा होते. पण काकांचे गावात वजन असल्यामुळे उघड बोलण्याचे धाडस कोणी केले नाही. मथू देवळात जाऊन पुराण सांगते तेव्हा सर्व स्त्री—पुरूषांच्या तोंडी वाहवा! वाहवा! असे उद्गार निघू लागते हे ऐकून मथू शतशः धन्य झाली असेल यात शंका नाही. मथू कुंकू लावते या कृतीचे सर्व बायका समर्थन करतात.

मथूने दुर्देवी स्त्रियांची बाजू घेऊन प्रगतीचा व आत्मविकासाचा खराखुरा मार्ग दाखवून दिला. स्त्रियांवर होत आलेल्या अन्यायाची कल्पना समाजाला आणून देऊन त्यापासून स्वतःची मुक्तात करून सुधारणेचा व सुधारणावादी मनोवृत्तीचा जोरदार पुरस्कार करून तथाकथित सनातनी पणाचा घातुकपणा व विषारीपणा सिध्द करून दाखविला. धर्म व धार्मिकता यांच्या नावाखाली चालणाऱ्या घातुक प्रकारांचा निषेध करून प्रतिगामी व

संकुचित मनोवृत्ती पासून बेसावध असणाऱ्या लोकांना वरेरकर यांनी आपल्या लेखनाने सावध केले.

पुनर्विवाह हा शब्द ऐकल्यानंतर पुनर्विवाह म्हणजे काय? हा प्रश्न मथूला पडतो. म्हणून मथू म्हणते — पुरूषांच्या विवाहाला म्हणजे पुन्हा केलेल्या लग्नाला पुनर्विवाह हा शब्द लावीत नाहीत. पुरूषांनी कितीही लग्न केली तरी तो नुसता विवाह आणि स्त्रीचे दुसरे लग्न झालं की त्याला म्हणतात पुनर्विवाह, हे ऐकून मथूच्या डोक्यात प्रश्नाचे काहूर माजू लागले होते. पुरूषांना एकापेक्षा जास्त लग्ने करण्याची सवलत असावी आणि बायकांना का असू नये? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देताना जाणकार व अनुभवी व्यक्ती ही पेचात पडतील. मथूने शास्त्राच्या अपुरेपणावर नेमके बोट ठेवून ताईला मार्मिक प्रश्न केला — "शास्त्रानं दोघांसाठी हे दोन नियम का केले? मथूच्या मते विधवेने कुंकू लावणे म्हणजे पुनर्विवाहाची पहिली पायरी चढणे होय."[१८] याचे ताई समर्थन करते.

चंदू मथूचे अभ्यासाबरोबरं तिच्याकडून पुराण वाचून घेत असे. मथू विषयी चंदूला अतोनात प्रेम वाटत असल्यामुळे तिच्या भवितव्याविषयी त्याला काळजी वाटत होती. म्हणूनच चंदू मथूला विचारतो, 'मथू तू माझी होशील कां' हा प्रश्न अर्थात तिला अनपेक्षित होता. म्हणूनच ती मूर्च्छित येऊन पडली. व तिच्या समोर अंधकार पसरला. जिला लग्न म्हणजे काय हेच माहित नाही व लग्न झाल्यामुळे काहीही संबंध नसणाऱ्या माणसांनी तिचा छळ केला. तिच्या हालअपेष्टा केल्या. लग्नामुळे तिचे सासर माहेर तुटते. बेवारशी होते. अशा मुलीली चंदू लग्न करावे का? हा प्रश्न विचारतो. ज्यांनी लग्नाचा अनुभव घेतला आहे. ज्यांनी संसारातील सुख— दु:ख भोगली असतील त्यांना हा प्रश्न विचारायचा सोडून तो एका बालविधवेला हा प्रश्न विचारून तिच्या दु:खावर डागण्या देतो असे वाटते.

पुनर्विवाहा विषयी मथूने विचार केलेला नसला तरी चंदूच आता लग्न होणार कुणी तरी अनोखळी मुलगी येऊन चंदूवर आपली सत्ता सांगू लागणार ही कल्पनाच मथूला दु:सह वाटते. पुनर्विवाहाचा प्रस्ताव येऊन सुध्दा त्याचा स्वीकार न करता उलट त्या काळच्या परिस्थितीनुरूप वागते.

चंदूसाठी बाहेर गावच्या मुली शोधण्यापेक्षा गावातील चांगली मुलगी जी चंदूला शोभून दिसेल अशी मुलगी पाहावी ? पण असे करणे आपल्याला शोभत नाही. कमीपणा येतो म्हणून परगावची मुलगी शोधायची जिच्या विषयी आपणास काहीही माहिती नाही हे मथूला पटत नाही. माणसे केवळ प्रतिष्ठेसाठी मुला—मुलींना बळीचा बकरा बनवतात आणि त्यांच्या आयुष्याचे मातेरे करतात. आपल्या आयुष्याचे मातेरे झाले तसे इतरांचे होऊ नये असे मथूला वाटत होते.

मथूचा लौकिक सर्वत्र पसरल्यामुळे गोपाळ भटजी मथूचे पुराण आपल्या गावी म्हणजे मथूच्या माहेरी घेण्याचे ठरवतात. तेथे मथूची बालमैत्रीण बनी व तिची आई गोपाळ भटजीजवळ कुजबुजू लागतात. मथू कुंकू लावते. याविषयी गोपाळभटजी देवाचा साक्षात्कार असल्याचे घरच्या लोकांना सांगतात व याविषयी काहीही बोलायचे नाही असे बनीला बजावतात.

मथू जेव्हा आपल्या माहेरी पुराण वाचन करते त्यावेळी बेचाळीस पूर्वजांचा आज उध्दार झाला असे मथूच्या वडिलांना वाटू लागते. याचे सर्व श्रेय मथू चंदूला देते. मथूचे पुराण ऐकल्यानंतर बनीलाही आपण शिकलो नाही याचे वाईट वाटते. म्हणूनच मथू बनीला सांगते जी चूक तू केलीस ती तुझ्या मुलीच्या बाबतीत करू नकोस असा सल्ला द्यायला मथू विसरत नाही. पुराण संपल्यानंतर मथूला आईची खूप आठवण येते. जरी वडील असले तरी आईविना मूल पोरके होते. याचा प्रत्यय मथूला येतो. मथू कुंकू लावते याचा

सर्वत्र गवगवा होतो. मथूला पाहण्यासाठी बायकांची गर्दी होते. त्याच्यात एक बारा–तेरा वर्षाची मुलगी होती. ती मथूची सावत्र आई होती. मथू कुंकू लावते हे तिच्या सावत्र आईला आवडत नाही. मथू जाण्यासाठी निघते तेव्हा बनी मथूच्या कपाळी कुंकू लावते हे पाहून मथूच्या सावत्र आईला ही आजकालच्या मुलींची थेरं आहेत असे वाटते.

मथू कुंकू लावते हे पाहून पुतणी लीला हिला महालक्ष्मीचा मुखवटा पाहात आहोत असे वाटते. पण ज्या जाऊबाईचा नणंद असताना तोंडातून एकही शब्द फुटत नाही तिच्या तोंडाचा पट्टा सुरू होतो. हे पाहून मथूला आश्चर्य वाटते. 'देवीला जसं काही विधवेखेरीज दुसरं झाडचं सापडत नाही!'[१९] अशा शब्दात मथूला टोमणे मारते. हे पाहून जाऊबाई वन्सांची सहीसही नक्कल करीत होत्या असे मथूला वाटते. मथू कुंकू लावते म्हणून नानासाहेब व मथू मध्ये जोराचे भांडण होते. आणि नानासाहेब मथूला घराबाहेर काढतात. मथू टांग्यात बसून स्टेशनकडे जाते. पुण्याच्या प्लॅटफॉर्मवर मथूची व चंदूची अकल्पित भेट होते. मथूची जबाबदारी चंदू आपल्या शिरावर घेतो. मथूला मिशनरी बोर्डीगमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी चंदू मदत करतो. सुपरिटेंडर बाई मिस् स्मिथ यांच्या देखरेखी खाली मथूचा शिक्षणक्रम सुरू होतो. मथूने ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या मदतीने शिक्षणातून आत्मोन्नतीचा मार्ग स्विकारला. मथूने बायबलावर मराठीतून पुराण सांगितले. आपल्या धर्मग्रंथाइतकाच आपणास दुसऱ्याच्या धर्मग्रंथाबद्दल आदर वाटतो असे मथू स्मिथ बाईना सांगते. मथू परिक्षेत सुयश संपादन करते. मथूला जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलरशिप मिळते. पण हा आनंद तिला दु:खदायक वाटतो.

रूढीनी जायबंदी केलेल्या समाजाला धर्मांतराशिवाय तरणोपाय नाही काय? हा प्रश्न अनेकांना त्या काळात छळत होता.

हया रूढी समाजातील विविध घटकांना त्रासदायक ठरत होत्या. आणि उदारमतवादी विचारांचे वारे हे ख्रिश्चन समाजातून आल्यामुळे त्या धर्माचे आकर्षण आणि भीती ही त्या काळचा आणि खरं तर आजचा ही ज्वलंत प्रश्न आहे. पंडिता रमाबाई यांच्या धर्मांतराचा प्रत्यक्ष उल्लेख कादंबरीत आहे. परंतु मथू ही आपल्या विचारांच्या साहय्याने हयाही बाबतीत महत्त्वाची दिशा दाखवते. धर्म विचारात आहे आचारात नाही. आचार मनुष्यप्रणीत आहे. हे तिला चटकन उमगते. तिच्यावर ख्रिश्चन होण्याविषयी काहीसा दबाब टाकण्यात येतो. चंदू आणि त्याचे मित्र यांचेकडून भीती व्यक्त करण्यात येते. तेव्हा ती विचार करते "मी ज्या धर्मात जन्म घेतला तो धर्म माझा आहे. सुदैवाने त्या धर्माची तत्त्वे मानवाला पूर्णावस्थेला पोहोचविणारी आहेत. त्या धर्माचा अभ्यास अजून सांगोपांग करण्याची संधी मला मिळाली नाही. माझ्या धर्माचा अभ्यास पूर्ण झाल्याशिवाय इतरांच्या धर्माचे परिणाम अनावर घडू न देण्याइतके माझे मन खंबीर आहे."[२०]

हया कादंबरीच्या छोटयाशा कालावधीत देखील मथूच्या मानसिकतेत आणि विचारशक्तीत खूपच प्रगती झालेली दिसते. काही प्रमाणात लेखकाने पंडिता रमाबाई विषयी अत्यंत आदर बाळगून ही त्यांचा जर सनातन्यांकडून छळ झाला नसता तर अशा तेजस्वी स्त्रीचे दुसरे एक रूप कसे होऊ शकले असते ते मथूच्या रूपाने दाखविले आहे. मथू तिच्या ख्रिश्चन हितचिंतकांना सांगते "येशू ख्रिस्तावर माझा पूर्ण विश्वास आहे. पवित्र शास्त्राबद्दल मला निस्सीम आदर आहे. भगवद्गीते इतकेच त्या ग्रंथावर माझं प्रेम आहे. पण प्रभू येशू ख्रिस्तांची भक्ती करण्यासाठी माझ्या धर्माचा मी का त्याग करावा हेच समजत नाही. माझा धर्म अत्यंत उदार आहे. जगाच्या कल्याणासाठी ईश्वराने अनंत अवतार घेतले असा माझा धर्म सांगतो. प्रभू येशू ख्रिस्ताचा अवतार हा त्यातीलच एक अवतार आहे. असे मला अंत:करणापासून वाटते."[२१]

'विधवाकुमारी' या कादंबरीतील सामाजिक बाजू जितकी परिणामकारक वाटते तितकीच कौटुंबिक जीवनाचे दर्शन ही यथार्थ आहे. मथूच्या आईचे मुलीविषयीचे प्रेम, ताईचे मथू विषयीचे मातृर्निविषयक प्रेम, ताईचा संसार सुखाचा होता पण मातृत्वाच्या प्रेमाला ती मुकली होती. म्हणूनच आपले हे मातृप्रेम ती आपला धाकटा दीर चंदू याला मुलगा समजून मातृत्व प्रेम मिळवत होती. मथूच्या हृदयातील स्त्रीत्व नाकारलेले नाही. तिची बालमैत्रीण बनी हिच्या मुलीला मथू जवळ घेते. ती बाळंतिणीची खोली, तो पाळणा, त्या शेगडया, तो ओव्याचा वास, काजळाने भरलेला तो चेहरा हे सर्व पाहून मथूच्या मनांत असणारी सुप्त मातृभावना उफाळून येते. लग्नाच्या बाबतीत शरीरसंबंध म्हणजे काय याचा जरी तिला कधी परिचय झालेला नसला तरी ती स्त्रीचे अपूर्णत्व मान्य करते. आणि पापी पुरूषांच्या अनुभवामुळे ती आपले रक्षण करण्यात अधिक सावध बनते.

भामा वरेरकर यांनी मथूच्या गृह-त्यागाचा रंगविलेला प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी आहे. काकासाहेब व ताई या दोघांनीही तिला अंतर दिले हे पाहून तिच्याविषयी तीव्र सहानुभूती वाटू लागते. सौ. कुसुमावती देशपांडे यांनी भामा वरेरकर यांच्या इतर नायिकाप्रमाणे मथूला हेकेखोर व अवखळ ठरविले आहे. वरेरकर यांच्या इतर नायिकांपेक्षा मथू ही अधिक सत्यनिष्ठ आहे. अगदी बालपणापासूनची तिची सत्याविषयीची आसक्ती भामा वरेरकर यांनी दाखविली आहे. विधवांनी कुंकू का लावायचे याचे समर्थन करताना मथू म्हणते, विधवांनी कुंकू लावले म्हणजे त्यांच्याकडे वाईट नजरेने पाहणाऱ्या लोकांची दृष्टी तरी बदलेल असा मथूचा ठाम विश्वास होतो. या एका तत्त्व प्रतिपादनाकरिता मथूने अत्यंतिक छळवाद सोसला म्हणून आज महाराष्ट्रात विधवा कुंकू लावू लागल्या आहेत, हे सत्य आहे.

सामाजिक रूढीमुळे लग्न ठरविताना पत्रिका जुळणे, हुंडा, लग्नखर्च हे सामाजिक प्रश्न किती अवघड होऊन बसतात. हे मामा वरेरकर यांनी आपल्या कादंबरीमध्ये मांडलेले आहे. अशिक्षितपणामुळे स्त्री वर्गच स्त्रीच्या विकासाच्या आड कसा येतो. याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरी मध्ये आलेले आहे. स्त्रीधन, बँकेतील बचत, विमा, यावर मथूचा अधिकार नसून आपला अधिकार आहे असे नानासाहेबांना वाटते. यामुळे पुरूषप्रधान समाजातील पुरूषाची स्त्रीवरची अरेरावी मामा वरेरकर यांनी आपल्या कादंबरीमध्ये मांडली. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायावर प्रतिकार करायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणाने बौध्दिक, मानसिक विकास साधावा व आर्थिक स्वावलंबन प्राप्त करून द्यावे परावलंबी जगणे हे अपमानित असते. त्यातून स्वतःची सुटका करून घेण्याचा प्रयत्न करावा असे मथू स्त्री वर्गाला सांगते. हे या कादंबरीमधून दिसून येते.

मथू धर्म व धार्मिकतेची कोंडी फोडण्याचा अट्टहासपूर्वक प्रयत्न करते. बायबलावर पुराण वाचलं नाही. असे सांगण्यास भाग पाडण्याचा काकासाहेबांना मी खोट बोलणार नाही, मग शपथ घेणं तर दूर राहीलं असे मथू निक्षून सांगते. बहिष्कार प्रकरणी सुध्दां तिचे व्यक्तित्व तावून सुलाखून बाहेर पडले आहे. मथू आपल्या स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागण्याचा निश्चय पार पाडते. ती खरीखुरी प्रगतीवादी आहे. तिची कर्तबगारी पुरूषनिरपेक्ष आहे. पुरूष व्देष अगर मानसिक विकृती अथवा मनोगंड तिच्या आड येत नाही.

'गतभर्तृका' हया टोपण नावाने. 'विधावा—कुमारी' ही मामा वरेरकर यांची जी कादंबरी प्रकाशित झाली तिचे मराठी रसिक वाचकांनी अपूर्व स्वागत केले. कथानक रचनेच्या चार्तुयाबरोबर मामा वरेरकर यांचे स्वभाव, दिग्दर्शन कौशल्य, बौध्दीक पातळीवरची चर्चा

व त्यांनी निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा हया अपूर्व आहेत. या कादंबरीने न. चि. केळकर यांना ह. ना. आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीपेक्षा अधिक चटकदार त्र आटोपशीर वाटली. [illegible]

[illegible] दुसरे कारण म्हणजे या कादंबरीची भाषाशैली मराठी भाषेचे इतके साधे मोहक शुध्द व घरगुती वळणाचे स्वरूप या कादंबरीत दिसून आले आहे की ते पाहून वाचकास हरिभाऊंची थोर परंपरा चालविण्यास साहित्य सेवक अवतरला असे वाटू लागले. हरिभाऊ यांच्या लेखनकलेप्रमाणेच बोध व कला याचे मधुर मिलन या कादंबरीमध्ये झालेले आहे. हरिभाऊंच्या गादीचे खरेखुरे वारस हे विधान सत्य करण्याकरिता 'विधवाकुमारी' ही कादंबरी योग्य आहे. या प्रकरणातील निष्कर्ष खालीलप्रमाणे —

(१) मामा वरेरकरांनी 'विधवाकुमारी' या कादंबरीमधून विधवांना नवा मार्ग दाखवला आहे. सत्यांतून निर्माण होणारी निर्भयता मथूच्या नसानसातून रसरसताना दिसते. तर मुलीच्या दुःखाने दुःखी होणाऱ्या आईचे चित्रण मामा वरेरकरांनी अतिशय कौशल्याने रेखाटले आहे. विधवेचे जिणे कशा प्रकारचे असते हे वरेरकरांनी मांडले आहे. विधवा झालेल्या स्त्रीला शिक्षणामध्ये कशा प्रकारची विघ्ने येतात हे वरेरकरांनी 'विधवाकुमारी' या कादंबरीत मांडलेले आहे.

(२) मामा वरेरकरांच्या कादंबऱ्यातील नायिका बंडखोर आहेत असे म्हणतात पण त्या उपजत बंडखोर नसतात तर परिस्थितीमुळे त्यांना बंडखोरी करावी लागते. 'विधवाकुमारी' या कादंबरीची नायिका मथू ही चोहोबाजूंनी होणारा कोंडमारा मोडून टाकण्याचे धैर्य दाखवते. मथू सासरच्या कोंडवाडयातून बाहेर पडून शाळेत जाऊ लागते. ही त्यावेळी एक बंडखोरी होती. दुसरी

बंडखोरी म्हणजे विधवा झाल्यानंतर ही कुंकू लावण्याचा नवा पायंडा मथू पाडते.

(३) 'विधवाकुमारी' हया कादंबरीची नायिका मथू हिच्या मन:स्थितीचे चित्रण रेखाटले आहे. तर ज्या लोकांशी आपले कोणत्याही प्रकारचे नाते नसतानाही जिव्हाळयाचे संबंध कसे निर्माण होतात याचे महत्त्व मामा वरेरकरांनी सांगितले आहे. 'विधवाकुमारी' हया कादंबरीमध्ये मामा वरेरकरांनी हृदय हलविणारा विषय हाताळला आहे व यातूनच विधवांचा उध्दार होण्यासाठी त्यांना शिक्षण दिले पाहिजे हे मामा वरेरकरांनी 'विधवाकुमारी' हया कादंबरीच्याव्दारे पटवून दिलेले आहे.

# संदर्भ सूची


१. वरेरकर भा. वि. (विधवाकुमारी) शुभदा सारस्वत प्रकाशन पुणे, — शाश्वत साहित्यमाला, तृतीय आवृत्ती १९९३ पृष्ठ क्रमांक — १२
प्रथम आवृत्ती १९३०

२. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १

३. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १८

४. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १२

५. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १८

६. तत्रैव पृष्ठ क्रमांक — २२

७. तत्रैव पृष्ठ क्रमांक — २५

८. तत्रैव पृष्ठ क्रमांक — २६

९. तत्रैव पृष्ठ क्रमांक — ३९

१०. तत्रैव पृष्ठ क्रमांक — ५०

११. तत्रैव पृष्ठ क्रमांक — ५५

१२. तत्रैव पृष्ठ क्रमांक — ६१

१३. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १०

१४. तत्रैव पृष्ठ क्रमांक — ९४

१५. तत्रैव पृष्ठ क्रमांक — ११७

१६. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १२०

१७. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १६१

१८. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १४

१९. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १५९

२०. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १८०

२१. तत्रैव पृष्ठ क्रमांक — १८१